## निशाणी क्र. ३४ वरील आदेश

०१. प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र. २ ते ६ यांनी दि. १४/१२/२०१८ रोजी झालेला विना कैफियत सुनावणीचा आदेश रद्द करुन मिळण्यासाठी दाखल केलेला आहे.

०२. प्रतिवादींचे अर्जातील कथन असे आहे की, प्रतिवादींचे आजोबा राम गणपत मुंढे हे दि. १५/०६/२०१९ रोजी मयत झाले. त्यांचा राजकीय व सामाजिक क्षेत्रात नावलौकिक असल्यामुळे या प्रतिवादींनी दाव्याचे समन्स मिळाल्यानंतर दाव्या संबंधिताची माहिती त्यांच्या आजोबांना दिली. त्यांचे आजोबा व वादी यांच्यामध्ये आपसात तडजोडीची बोलणी झाली. या तडजोडीमध्ये वादी दावा काढून घेतील असे ठरले होते. वादी यांनी दावा काढून घेण्याचे आश्वासन दिल्यामुळे प्रतिवादी हे कोर्टात हजर राहिले नाहीत व त्यामुळे त्यांनी कैफियत दाखल केली नाही. ठरल्याप्रमाणे वादी क्र. १ व २ यांनी प्रतिवादीच्या नावाची नोंद महसुल दप्तरी केली नाही त्यामुळे प्रतिवादी यांनी वादी यांना आठवण करुन देण्यासाठी जानेवारी २०२३ मध्ये भेट दिली असता त्यावेळी वादी यांनी जमीन देता येणार नाही असे सांगितले. त्यानंतर प्रतिवादी यांनी वकीलांची भेट घेतली व सदरचा अर्ज दाखल केला आहे. सदरचा अर्ज मंजुर केल्यास वादीचे कोणतेही नुकसान होणार नाही. याउलट प्रतिवादींना कैफियत दाखल करण्याची संधी न दिल्यास वादींचे मोठे नुकसान होणार आहे. म्हणुन शेवटी प्रतिवादी यांनी दि. १४/१२/२०१८ रोजीचा विना कैफियत सुनावणीचा आदेश रद्द करुन कैफियत दाखल करण्याची परवानगी देण्यात यावी अशी मागणी केली आहे.

०३. वादी यांनी या अर्जावर आपले म्हणणे दाखल केले. प्रतिवादींचे अर्जातील कथन खोटे व बनावट असल्याचे वादीने कथन केले. वादी असे कथन करतो की, अर्जात नमुद केल्याप्रमाणे वादी व प्रतिवादी यांच्यात कधीही तडजोडीची बोलणी झालेली नव्हती. मुदतीत कैफियत दाखल करणे ही प्रतिवादींची जबाबदारी असताना ते वादींवर जबाबदारी ढकलत आहेत. सदर दाव्यात दि. १४/१२/२०१८ रोजी विना कैफियत सुनावणीचा आदेश झालेला आहे. सदरचा अर्ज तब्बल चार वर्षानंतर दाखल केलेला आहे त्यामुळे प्रतिवादीचा अर्ज खर्चासह रद्द करण्यात यावा.

०४. वादी व प्रतिवादी यांच्या वकीलांचा युक्तीवाद ऐकला. प्रतिवादीच्या वकीलांनी असा युक्तीवाद केला की, तडजोडीची बोलणी चालल्यामुळे व वादी यांनी तडजोड मान्य केल्यामुळे सदरचा दावा वादी यांनी काढून घेतला असेल असे समजून प्रतिवादी हे न्यायालयात गैरहजर राहिले व त्यांनी कैफियत दाखल केलेली नाही. याउलट प्रतिवादीचे वकीलांनी असा युक्तीवाद केला की, प्रतिवादी यांनी जाणीवपुर्वक चार वर्षापेक्षा जास्त कालावधीनंतर सदरचा अर्ज दाखल केलेला आहे. सदरच्या अर्जासाठी दिलेली कारणे ही काल्पनिक व खोटी आहेत. प्रतिवादी यांनी प्रत्येक दिवसाच्या विलंबाचे कारण अर्जात नमुद केलेले नाही. अशा परिस्थितीत प्रतिवादीचा अर्ज खर्चासह रद्द करण्यात यावा.

०५. सदरचा दावा वादी यांनी ठरावाकरीता अतिक्रमण काढून मिळण्याकामी तसेच निरंतर मनाई हुकूमासाठी दाखल केला आहे. वादी व प्रतिवादी यांच्यामधील वादाचे स्वरुप हे दिवाणी स्वरुपाचे आहे. प्रतिवादी यांनी अर्जात कैफियत दाखल करण्यास झालेल्या उशीराचे कारण प्रथमदर्शनी संयुक्तीक व योग्य वाटत नसले तरी नैसर्गिक न्यायाच्या दृष्टीने वादी व प्रतिवादी यांच्यामधील वादाचे कायमस्वरुपी निराकरण करण्याकरीता व दाव्याचा गुणदोषावर निकाल लावण्याकरीता प्रतिवादी यांना त्यांची कैफियत दाखल करण्यास परवानगी देणे आवश्यक वाटते. म्हणुन मी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## <u>आदेश</u>

१. प्रतिवादी क्र. २ ते ६ यांच्या विरुद्ध झालेला विना कैफियत सुनावणीचा आदेश रद्द करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्र. २ ते ६ यांनी एकत्रितरित्या कायदेशीर खर्च म्हणुन रक्कम रु. ५,०००/– वादी यांना द्यावेत.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by WABALE RAMDAS DAULAT
Date: 2023.04.10 17:44:22 -0800

खालापूरः **(आर.डी.वाबळे)**

दि. १०/०४/२०२३ दिवाणी न्यायाधिश क.स्तर खालापूर

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order are same word to word as per the original Judgment/Order.

| | | |
|---|---|---|
| (a) | Name of the Stenographer | : M. S. Shirgire, Steno. (L.G.) |
| (b) | Court | : Shri. R. D. Wabale<br>C.J.J.D. & J.M.F.C., Khalapur |
| (c) | Date of Judgment/Order | : 10/04/2023 |
| (d) | Judgment/Order signed by the Presiding Officer on | : 10/04/2023 |
| (e) | Judgment/Order uploaded on | : 10/04/2023 |